
# मुक्ती विमर्श

Title Code : MAHMAR52041

https://muktivimarsh.in

वर्ष : १ – Year : 1st । अंक : २३ – Issue 23rd । शुक्रवार, १५ ते ३० नोव्हेंबर २०२४ – Date:15 to 30 November 2024 । पाने ८ – Page : 8 । किंमत १० रुपये –

## निवडणुक विशेषांक



## डॉ. आंबेडकर यांचे निवडणूक युती व आघाडी विषयीचे मत:

डॉ. आंबेडकरांनी शेड्यूल्ड कास्टसफेडरेशनचे राजकीय पक्षाबरोबर सहकार्य व निवडणूक युती करण्यासाठी खालीलपैकी शर्ती मांडल्या –

१. अशा युतीतील प्रत्येक पक्षाने आपली तत्वे स्पष्ट शब्दात मांडलेली असली पाहिजेत;

२. अशा पक्षाच्या तत्वांच्या शेडूल्ड कास्टस फेडरेशनच्या तत्वांना विरोध नसावा;

३. युती करणाऱ्या पक्षाने अनुसूचित जातींच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी पाठिंबा देण्याचे वचन दिले पाहिजे;

४. पक्षाने शेड्युल्ड कास्टस फेडरेशनला त्याच्या अंतर्गत बाबींच्या बाबतीत फेडरल ऑर्गनायझेशन मध्ये स्थापत्य एकक म्हणून कार्य करण्यास सहमती देणे आवश्यक आहे; आणि

५. पक्ष अशा कोणत्याही पक्षाशी संलग्न नसावा

२५ एप्रिल १९४८ रोजी लखनऊ येथे भरलेल्या अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या परिषदेत भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, राजकीय सत्ताही सर्व प्रगतीची गुरुकिल्ली आहे आणि आपला एक तिसरा पक्ष संघटित करून व प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांमधल्या समतोलपनाच्या तराजूची दांडी आपल्या हातात ठेवून शेड्युल कास्टस फेडरेशनने सत्ता काबीज केली, तरच आपण आपली मुक्ती मिळू शकू. मी काँग्रेस मंत्रिमंडळात सहकार्य केल्याने पददलित समाजाच्या पुष्कळ गोंधळ झालेला आहे आणि त्यांच्या शंकांचे व संशयाचे निरसन मला करायचे आहे. सतत २५ वर्षे काँग्रेसविरुद्ध लढा दिल्यावर अशा आणीबाणीच्या वेळी मी मौन का पत्करले असे मला विचारण्यात येते. खरे पाहता सतत लढा देत राहणे ही काही सर्वोत्तम युद्धनीती नाही. इतर नीतिंचा सुद्धा अवलंब करणे व अगत्याचे आहे. आम्ही मैत्रीच्या हात पुढे करून पाहिला व त्यात आम्हाला बरेचसे यश आले. काँग्रेसशी विरोधी भूमीका ही घेण्याची वेळ नाही. काँग्रेसशी सख्य व सहकार्य करून जेवढे पदरात पाडून घेता येईल, तेवढे पाडून घेतले पाहिजे. मी केंद्र सरकारात सामील झालो आहे; परंतु मी, काँग्रेसने मला निमंत्रण दिले आणि मी कोणतीही अट न घालता शामिल झालो.तेथे राहणे निरर्थक आहे. असे मला ज्यावेळी वाटेल त्यावेळी मी तिथून बाहेर पडेल. आमची परिस्थिती अशी आहे की राज्य कारभार नियंत्रणेत आमची माणसे असणे आवश्यक आहे.

### सं । पा । द । की । य

## घटना व ब्राम्हणवाद : परस्पर विरोधी विचारधारा

‘मुक्तिविमर्शचा अंक महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रकाशित होत आहे. स्वाभाविकपणे हा जनतेसमोर जे प्रश्न निर्माण झालेले त्यावर चर्चा करण्याचा हा प्रयत्न आहे. निर्माण झालेल्या प्रश्नाचा उहापोह व विश्लेषण हा जनतेला निवडणुकीमध्ये योग्य निर्णय घेण्यास उपयोगी ठरेल. तथापि २०१४ नंतर जी नवीन आव्हाने देशासमोर व महाराष्ट्रासमोर उभे झाली आहेत. नवीन आव्हानांची गंभीरता व तीव्रता लक्षात घेवून दोन परस्पर विरोधी विचारसरणींना मानणा–्या आघाड्या जनतेसमोर उभ्या आहेत. काही स्वतंत्र पक्ष तिसरी व चौथी आघाडी सुद्धा एक विशिष्ठ विचारसरणी व कार्यक्रम घेवून जनतेसमोर उभी आहे. मुक्ती विमर्श चा अंक प्रामुख्याने ह्या आघाडीच्या विचारसरणीची व कार्यक्रमाची चिकित्सा करत आहे. २०१४ नंतर जी आव्हाने राजकीय पक्ष व जनते समोर उभे झाले आहेत ही प्रामुख्याने घटनेशी संबंधित आहेत. घटनेच्या प्रस्तावनेमध्ये (Preamble) देशाची राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक रचनेची तत्वे स्पष्टपणे मांडली आहेत. प्रास्ताविकामध्ये घटना हे मांडते की, लोकशाही, धर्मनिरपेक्षता,समाजवाद जनतेचे प्रतिनिधी आधारित सरकार ह्या चार तत्वांवर राज्याचे शासन आधारित राहील. राज्याचे शासन लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीव्दारे चालेल ते राजेशाहीच्या मार्गाने चालणार नाही. ही भूमिका घटना प्रस्तुत करते. शिवाय राज्य धर्मनिरपेक्ष असणे म्हणजे राज्य एका विशिष्ठ धर्माच्या शिकवणुकीच्या आधारावर चालणार नाही. हे ही मान्य करते.ह्याशिवाय सरकार समाजवादी तत्वावर म्हणजे अशा अर्थव्यवस्थेवर आधारित राहील जी समाजवादी स्वरुपाची असेल. घटनेची प्रस्तावना ह्या तत्वाच्या आधारावर काही उद्दिष्टे सुद्धा पूर्ण करण्याची जबाबदारी राज्यावर व सरकारवर बंधनकारक ठरवते.राज्यात जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीव्दारे समाजामध्ये न्याय्य (सामाजिक, आर्थिक व राजकीय), स्वातंत्र्य (विचारांचे, धर्माचे, व्यक्तीचे), समानता (सामाजिक दर्जा, संधी), व बंधुत्वाची भावना (व्यक्तीचे मूल्य व राष्ट्राची एकता) वाढविण्याची व जोपासण्याची जबाबदारी सरकारवर देते. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही उद्दिष्टे धर्मनिरपेक्ष व लोकशाही प्रणीत मार्गाने पूर्ण करण्याची जबाबदारी राज्यावर देते. ह्याशिवाय मार्गदर्शक तत्वांमध्ये (Part -IV, Article 36-51) सरकारने जनतेच्या कल्याणासाठी धोरणे राबवावी हे पन निश्चित करते.

आपल्याला हे स्पष्ट दिसते की, २०१४ नंतर मागच्या दहा वर्षामध्ये तात्विक पातळीवर व कृतीमध्ये राज्याची वेगळी संकल्पना मांडून ती राबविण्याचे प्रयत्न जोमाने केले जात आहेत. घटना ज्या तत्वावर आधारित आहे त्याऐवजी घटनेला पर्यायी तत्वज्ञानाचा आधार देण्यात येत आहे व काही बाबतीत कृतीमध्ये आणल्या जात आहे. ही पर्यायी विचारसरणी किंवा तत्वज्ञान म्हणजे ब्राम्हणवाद होय. हिंदुवादाच्या नावावर ब्राम्हणवादाचाच पुरस्कार करुन तो वेगवेगळ्या मार्गाने २०१४ पासून कृतीत आणला जात आहे. हे समजणे महत्वाचे आहे की, ब्राम्हणवादाचे स्वतंत्र असे राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक तत्वज्ञान किंवा विचारसरणी आहे. ब्राम्हणवादाची राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विचारसरणी ही भारतीय घटनेच्या तत्वज्ञानाच्या परस्परविरोधी आहे. घटना ही सत्याचा आग्रह धरते. सत्य ही सद्सद विवेक बुद्धी व अनुभवाला आधार मानते. परंतु ब्राम्हणवाद हा वेदांमध्ये जे सांगितले आहे त्यालाच सत्य असे मानतो. ते न बदलणारे व निरंतर आहे. त्याविषयी प्रश्न व शंका घेण्याचे स्वातंत्र्य नाही. घटना धर्मनिरपेक्ष ह्या तत्वाचा पुरस्कार करते. ह्याउलट ब्राम्हणवाद ब्राम्हणवादी धर्माच्या आधारावर राज्य चालावे हा आग्रह करते.लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीव्दारे सरकारचा कारभार चालवा असा आग्रह घटना करते. परंतु ब्राम्हणवाद दैवी शासनाचा (Divine Governance) पुरस्कार करतो. घटनेनुसार जनता ही सार्वभौम आहे. तर ब्राम्हणवादामध्ये एक विशिष्ठ जात/गटांना महत्व देण्यात येते. वैश्य, शुद्र व अस्पृश्यांचा त्यामध्ये फारसा सहभाग होत नाही. त्याचप्रमाणे घटना ही जनतेच्या कल्याणाकरिता, समाजवादी अर्थव्यवस्थेचा आग्रह करते. ह्याउलट ब्राम्हणवाद खाजगी अर्थव्यवस्थेवर भर देतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे ही धर्मनिरपेक्ष, लोकशाही, समाजवादी व सार्वभौम ह्या तत्वांवर राज्याचे शासन चालावे हे घटना निर्देशित करते. ह्याउलट ब्राम्हणवाद एका धर्माच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार करतो. खाजगी अर्थव्यवस्था व एका विशिष्ठ जातीच्या स्वामित्वाला प्राधान्य देतो.

हा विरोधाभास उद्दिष्टामध्ये सुद्धा आढळतो. घटना ही राज्यावर, न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता व राष्ट्रीय एकता जोपासण्यावर भर देते. ह्या विरुद्ध ब्राम्हणवाद असमानता, बंधन, जातीय ध्रुवीकरण, जाती–जातीमधील संघर्ष व कलह, समाज विरोधी तत्व व मूल्य या वर आधारित जाती व्यवस्थेचा पुरस्कार करते.ह्या मुक्ती विमर्शच्या अंकामध्ये राज्यघटना व ब्राम्हणवाद ह्यांच्यामधील परस्परविरोधी विचारसरणीची चर्चा करण्यात आली आहे. त्यामुळे जनतेला सध्याची स्थिती समजून घेण्यास मदत होईल. त्याच बरोबर निवडणुकीमध्ये योग्य तो निर्णय घेण्यास मदत होईल ही आशा आहे.

# राज्य शासनाचे ब्राम्हणीकरण करण्याचा प्रयत्न

–डॉ. गौतम कांबळे

ब्राह्मणवादी धर्माच्या चौकटीत संविधानाला बांधण्याचे प्रयत्न २०१४ पासून जोमाने सुरु आहेत. हे सरकारच्या व त्यांना मदत करणा–या संघटनेच्या विचारातून व कृतीतून अगदी स्पष्ट झाले आहे. हिंदुधर्म, सनातन धर्म, गीता, मनुस्मृती ह्यांवर आधारित घटना असावी असे पर्याय सुचविले जातात. ह्या सर्व पर्यायाचा अर्थ एकच आहे; व तो म्हणजे ब्राम्हणवाद. ब्राम्हणवादी धर्माचे निश्चित असे धार्मिक आणि सामाजिक तत्वज्ञान आहे. ही धार्मिक विचारसरणी असे मानते की, ‘वेद’ ग्रंथ हे अपौरुषेय व पवित्र आहेत, प्रश्नापलीकडील आहेत. ते चिरंतन व चिरकाल आहेत. ब्राह्मणवाद मानतो की, ईश्वराने या भौतिक व मानवी जगाची निर्मिती केली आहे. वैदिक यज्ञ आणि धार्मिक विधी–कर्मकांडांचे पालन केल्याने मानवाचा उद्धार होतो. वैदिक ब्राह्मणवाद मृत्युनंतरचे जीवन व पुनर्जन्म यावर विश्वास ठेवतो. पुनर्जन्म हा कर्मावर अवलंबून आहे. माणसाचे वर्तमानातील जीवन हे मागच्या जन्मातील कर्मावर अवलंबून आहे, तसेच पुढच्या जन्मातील जीवन हे वर्तमान काळातील कर्मावर ठरते. परंतु वर्तमान काळात बदल अशक्य आहे. वर्तमान काळात जातीनुसार वागणे हाच योग्य मार्ग आहे. जो शाश्वत ब्राह्मणवाद आहे तो यज्ञात प्राण्यांची बळी देणे व विविध कर्मकांड करणे यावर विश्वास ठेवतो.


सामाजिक व्यवस्थेबाबतीत जाती व्यवस्था ही वैदिकवादाची आदर्श समाजव्यवस्था आहे, जी ईश्वराने निर्माण केली आहे. समाज हा चार वर्णामध्ये विभागला आहे जो असमानतेवर आधारित आहे. त्यातील प्रत्येक जातीचा व्यवसाय हा जन्माने निर्धारित आहे. एक जात इतर जातीचा व्यवसाय करू शकत नाही, या चार वर्णामध्ये सामाजिक समता नाही. शुद्र, महिला व वर्णव्यवस्थे बाहेरील वर्ग जो अस्पृश्य आहे, यांना शिक्षणाचे अधिकार नाहीत. या तथाकथित आदर्श समाजात बहुसंख्य निम्न जातींना आर्थिक, सामाजिक व धार्मिक अधिकार नाकारले आहेत व ब्राह्मणांना अपार विशेषाधिकार दिले आहेत.

या धार्मिक आणि सामाजिक तत्वज्ञानाचा हेतू उच्च जातींचा आर्थिक फायदा, सत्ता व समाजातील उच्च स्थान मिळविणे आहे. ऋग्वेदापासून उत्पत्ती पावलेली हिंदूंची सामाजिक संस्था सर्वच ब्राह्मणी धर्मग्रंथामध्ये नमूद केलेली आहे, ज्यामध्ये चार वेद, गीता, मनुस्मृती, इतर स्मृती, पुराणे, उपनिषद, रामायण आणि महाभारत यांचा समावेश होतो. थोडक्यात ब्राम्हणवाद तर्क व अनुभवावर आधारित नाही. तो वेदामध्ये दिलेल्या ज्ञानावर आधारित आहे. सामाजिक व्यवस्था वेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे जातींवर आधारित आहे.

प्रचलित घटनेला विरोध करण्याचे कारण म्हणजे घटनेमधील सर्व तत्वे ही ब्राम्हणवादाच्या विरोधी आहेत. घटना धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद व लोकप्रमाणीत राज्याची संकल्पना मान्य करते. परंतु ब्राम्हणवाद, एका धर्माच्या विचारावर आधारित राज्य, एक पक्षीय राज्य व खाजगी मालमत्ता ह्यावर आधारित आहे. ब्राम्हणवाद हिंसेला मान्यता देतो. सामाजिक व्यवस्थेच्या बाबतीत ब्राम्हणवाद हा असमानतेवर आधारित जातीव्यवस्था मानतो. स्वातंत्र्यावर बंधन आणणे व बंधुभावाला नाकारणे, जाती–जातीमध्ये कलह व द्वेषाची भावना जागृत करतो. ह्याविरुद्ध समानता, स्वातंत्र्य व बंधुभाव हे घटनेचे उद्दिष्ट आहेत. अहिंसेच्या मार्गाने ही उद्दिष्ट पूर्ण करण्याचे घटना मान्य करते. सर्वात महत्वाचे म्हणजे ब्राम्हणवाद हे उच्च जातीचे आर्थिक कल्याण करण्याचे तत्वज्ञान आहे. आर्थिक फायद्याबरोबर (Economic Gain ), सत्ता (Political Power), व उच्च सामाजिक दर्जा (High Social Status) सुरक्षित करण्याची तरतूद करते.

भारतीय घटना ही समानतेच्या तत्वावर आधारित असल्यामुळे व उच्च जातीचे विशेष अधिकार काढून घेतल्या मुळे उच्च जाती हे प्रचलित घटना वगळून ब्राम्हणवादावर आधारित घटना बनविण्याचे आटोकाट प्रयत्न करीत आहे. त्यामध्ये उच्च जातींकडे आर्थिक, राजकीय व सामाजिक सत्ता राहावी हे एकमेव उद्दिष्ट आहे. ब्राम्हणवादी आर्थिक, राजकीय व सामाजिक व्यवस्था उच्च जातीतील विशेष अधिकार देऊन, तेच अधिकार दलित, आदिवासी व अन्य जमातीला नाकारते.

वाढते खाजगीकरण हा ह्या धोरणाचा भाग आहे. तसेच खाजगीकरणामुळे आरक्षणाचे संकुचीकरण हा सुद्धा ह्या धोरणाच्या भाग आहे. दलित, आदिवासी, मुस्लीम, ख्रिश्चनावर वाढते अत्याचार हा वाढत्या ब्राम्हणवादाचा परिणाम आहे. अध्यक्षीय पद्धतीचे सरकार (Presidential form of Government) एक निवडणूक व एक राष्ट्र हे सुद्धा बहुसंख्य असलेल्या धार्मिक सांप्रदायाचा फायदा सत्ता काबीज करण्यासाठीच पुढे मांडला आहे. अशा विविध प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गाने राज्याचा आधार ब्राम्हणवादी विचारसरणी घडवीत आहे. त्यावर निवडणुकीमध्ये जनतेने विचार करणे गरजेचे आहे.



# रोजगार विरहित आर्थिक विकासाची समस्या

–प्रा.श्रीनिवास खांदेवालें
नामवंत अर्थतज्ज्ञ



आज भारतात सगळ्यात मोठी समस्या कुठली असेल तर ती बेकारीची. अर्थकारणाचे जे प्रारूप आपण अवलंबत आहोत त्यात अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढले, आर्थिक विकासाचा दर वाढला, सकल घरेलू उत्पादन वाढले, राष्ट्रीय उत्पन्न वाढले म्हणून आपण आपली पाठ थोपटून घेत आहोत. पण जर हा विकास रोजगार निर्माण करणार नसेल तर त्याचा सामान्यजनांना काय फायदा? रोजगारीची योग्य वाढ होत नसल्यामुळे देशातील विविध भागातून बेरोजगाराचे उठाव होत आहेत.

**रोजगारविहीन विकासाची संकल्पना:**

कोणत्याही देशात विकास प्रक्रिया सुरू होताच, त्यात होणारी भांडवली गुंतवणूक काही प्रमाणात विकास कामांमध्ये श्रमिकांची मागणी वाढवून रोजगार निर्माण करण्यासाठी खर्च होते (उदा. रस्ते बांधणी, धरणे, आवास व्यवस्था इत्यादी कामांमध्ये रोजगाराची वाढ होते). ही एक विकासातील एक सामान्य प्रक्रिया आहे, जे भारताच्या विकास प्रक्रियेत १९६० पासून आपणास स्पष्टपणे दिसून येते. रोजगारविहीनता ही मुख्यतः आधुनिक स्वयंचलित तंत्रज्ञानाशी संबंधित आहे. जितकी जास्त प्रमाणात आधुनिक स्वयंचलित यंत्रसामग्री उत्पादन प्रक्रियेत वापरली जाते, तितकी पारंपरिक साध्या उत्पादन पद्धतींच्या तुलनेत कमी रोजगार निर्मिती होते. गुंतवणुकीच्या एका मात्रेमध्ये पूर्वी जितका रोजगार निर्माण होत होता, तो आता आधुनिक तंत्रज्ञानामुळे कमी झाला आहे. त्यामुळे रोजगारविहीन विकासाची संकल्पना ही पारंपरिक उत्पादन तंत्र आणि आधुनिक स्वयंचलित उत्पादन तंत्र यांच्या तुलनेवर आधारित आहे.

भारताच्या संदर्भात, उत्पादनात तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना रोजगार वृद्धी कमी होत आहे, असा मुद्दा मांडला जातो. उदाहरणार्थ, मोटारी, दुचाकी गाड्यांच्या उत्पादनात वाढ झाली तरी संबंधित कारखान्यांमध्ये रोजगार तितक्याच प्रमाणात वाढताना दिसत नाही. जगभरातील अर्थशास्त्रज्ञ व तंत्रशास्त्रज्ञ रोजगारविहीन विकासाचा धोका सतत व्यक्त करत आहेत.

**भारतात रोजगार विरहित विकासाची वैशिष्टे:**

आपण १९८१ पासून २०२३ पर्यंत भारताच्या राष्ट्रीय उत्पादनातील सकल मूल्यवर्धनाचा दर, रोजगार वाढीचा दर आणि त्यांच्यातील गुणोत्तराच्या आधारे रोजगाराची वृद्धी लवचिकता यांची दीर्घकालीन प्रवृत्तीची पाहणी करता रोजगारीची स्थिती आपल्याला लक्षात येते. हा १९८०–८१ पासून २०२२–२३ पर्यंत सकल मूल्य वृद्धीचा दर हे दाखवतो की, तो अल्पकालीन उच्चावचनांशिवाय वाढ वा घटीची कोणतीही दीर्घकालीन प्रवृत्ती दर्शवत नाही आणि तो ४ ते ८ % च्या दरम्यान कमी–अधिक होताना दिसतो. ही आकडेवारी २०१६–१७ ते २०२२–२३ ह्या काळात विशेष बदल झाल्याचे दाखवत नाही. वार्षिक रोजगार वृद्धीचा दर सुद्धा काही वैशिष्टे दाखवतो. २०१४ ते २०१७ या कालावधीत १.१ ते १.६ या दरम्यान स्थिरावलेला होता तो दर २०२०–२१ ते २०२१–२२ या वर्षात कमी झाला आणि केवळ २०२२–२३ मध्ये वर गेलेला आढळतो. सूक्ष्मरीतीने पाहिल्यास रोजगार वाढीचा दर हा १९८३ पासून तर २०१७ पर्यंत मंद गतीने घसरतच आहे. तथापि २०१८–१९ ते २०२०–२१ या काळात त्यात वाढ झाली आणि परत २०२१ ते २२ दरम्यान तो खाली आलेला दिसतो आणि २०२२–२३ तो पुन्हा वाढलेला दिसतो. म्हणजे रोजगार वाढीचा दर शेवटचे वर्ष सोडल्यास वाढीची प्रवृत्ती दर्शवित नाही.

**रोजगाराची लवचिकता स्थिर :**

रोजगार वृद्धी दर/सकल मूल्यवृद्धी दर यांचे गुणोत्तर मूल्यवर्धनाच्या दराचा रोजगार वाढीच्या रावर होणारा परिणाम दर्शवतो.

म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नातील १% मूल्यवर्धनामुळे रोजगार किती टक्क्यांनी वाढतो हे दाखवणारे गुणोत्तर; यालाच तांत्रिक भाषेत रोजगाराची वृद्धी लवचिकता असे म्हणतात. (Emloyment elasticity) १९८३ पासून २०२३ पर्यंत हे गुणोत्तर थोड्याफार फरकाने स्थिर राहिल्याचे दिसते. मात्र, १९९१–९२ आणि २०१९–२० या दोनच वर्षांत हे गुणोत्तर १ पेक्षा जास्त होते; बाकीच्या सर्व वर्षांत हे गुणोत्तर १ पेक्षा कमी राहिले आहे. याचा अर्थ असा की, मूल्यवर्धन ज्या गतीने होते, त्या गतीने रोजगार निर्माण होत नाही. हेच रोजगारविहीन विकासाचे लक्षण आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडिया (RBI) च्या आकडेवारीनुसार भांडवलाच्या संचयाचा दर १९८१ मध्ये ५.७ होता, तो २००७ मध्य १०.१ पर्यंत वाढला होता. नंतर मात्र तो सातत्याने घसरत गेला आणि २०२३ मध्ये ५.९ झाला, म्हणजे २०२३ चा भांडवल संचय दर १९८१ दराइतकच होता, हे अधोरेखित होणे महत्त्वाचे आहे. विशेषकरून तो २०१६ पासून ते २०२३ पर्यंत सातत्याने घसरत गेला असल्याचे दिसते. ही घसरण का आहे व अशी घसरण चालूच राहिल्यास भविष्यातील रोजगार निर्मितीवर त्याचा काय परिणाम होईल हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक कारखानदारी सर्वेक्षण या प्रकाशनानुसार २०१०–११ मध्ये कारखानदारी रोजगार वृद्धीचा दर ७.६ टक्के होता. त्यानंतर, हा दर खालच्या पातळीवर अस्थिर राहिला आणि २०२०–२१ मध्ये तो ऋणात्मक झाला. मात्र, २०२२–२३ मध्ये तो वाढून ७.५ टक्क्यांवर पोहोचला. २०१०–११ आणि २०२२–२३ या दोन्ही वर्षांत रोजगार वृद्धीचा दर जवळजवळ समान होता. त्यामुळे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल की २०२२–२३ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेने २०१०–११ चा रोजगार वृद्धीचा दर पुन्हा प्राप्त केला.

श्रम सहभागितेत जी वाढ झालेली दिसते ती ग्रामीण व शहरी क्षेत्रात पुरुषांमध्ये नाममात्र आहे, महिलांच्या बाबतीत शहरी भागात त्यांचे प्रमाण १४.२% वरून २०.७% पर्यंत वाढले मात्र ग्रामीण भागातच हे प्रमाण प्रामुख्याने वाढले : ते गुणोत्तर २०१७–१८ मध्ये १७.५% होते ते २०२३–२४ ते ३४.८% झाले, म्हणजे हे प्रमाण ग्रामीण भागात दुपटीने वाढले.

सारांशात्मक स्वरुपात असे म्हणता येते की, स्वयंचलित तंत्रज्ञानाच्या आगमनानंतर वस्तू आणि सेवांचे उत्पादन वाढते, परंतु त्याच प्रमाणात रोजगार वाढत नाही. हाच रोजगारविहिनतेचा मुद्दा महत्वाचा आहे. एकूण श्रम सहभागीतेत ग्रामीण भागातील महिलांचा श्रम सहभाग वाढला आहे, परंतु त्या रोजगाराची स्थिरता, कायमत्व, आणि मजुरीचे दर यावर ह्याविषयी आपणास कल्पना नाही. याचा अर्थ असा की केवळ श्रम सहभाग वाढला असला तरी रोजगाराच्या गुणवत्तेबाबत अद्याप अनिश्चितता आहे. याच पार्श्वभूमीवर, तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर सगळ्यात जास्त आहे हे सरकारलाही मान्य आहे परंतु त्यावर उपाय अग्निवीर सारखा अल्पकालीन व अस्थिर रोजगार देणे असा होऊ शकतो का? त्याचप्रमाणे अस्थिर आणि कमी पगाराच्या नोक–यांमध्ये अडकलेले, रस्तोरस्ती दिसणारे व तयार अन्न पुरविणारे तरुण (डिलिव्हरी बॉईज) असा असू शकतो का? त्यामुळे बेरोजगारी आणि अस्थिर रोजगार या दोन्ही समस्या कायम आहेत.

जागतिक बँकेच्या १७ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, १९९० च्या तुलनेत २०२४ मध्ये अधिक भारतीय दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. हा निष्कर्ष धक्कादायक आहे कारण १९९० च्या आधी आपली अर्थव्यवस्था समाजवादाकडे झुकणारी होती. त्यावेळी जास्तीत जास्त लोकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी राज्य हस्तक्षेप होता. त्यामुळे, प्रश्न असा उपस्थित होतो की, उदारीकरणानंतरची धोरणे आणि तंत्रज्ञानाच्या वाढीचा फायदा सामान्य लोकांपर्यंत पोहोचतो आहे का? जर दारिद्र्य वाढत असेल, तर ही धोरणात्मक दिशा फेरविचाराची मागणी करते.

***

# महाराष्ट्रातील शिक्षणामधील विषमतेचा प्रश्न

–डॉ. खालिद खान (प्राध्यापक, भारतीय दलित संशोधन संस्था, दिल्ली)



राज्य घटनेनुसार शिक्षण ही मुलभूत गरज आहे हे मान्य केले आहे. त्यामुळे सर्वांनाच शिक्षण मिळणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महाराष्ट्र सरकारने सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध करण्याकरिता धोरणे वापरली. तथापि वेगवेगळे धोरणे अंमलात आणूनही सामाजिक गटांमध्ये उच्च शिक्षणातील असमानता अजूनही कायम आहे. ही उच्च शिक्षणामधील वर्गावर्गामधील विषमता शिक्षण महाग झाल्यामुळे व उच्च शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे निर्माण झालेली आहे. म्हणून शिक्षणातील आंतर-समूह असमानता कमी करणे हा मुद्दा सध्याच्या निवडणुकीमध्ये मांडणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणामधील असमानतेची गांभीर्या ही काही आकडेवारी देवून लक्षात येवू शकते.

शिक्षणाचा दर : २०१७–१८ राज्य स्तरावर १८ ते २३ वयोगटातील सुमारे ३४.१ टक्के तरुणांनी महाराष्ट्रातील बॅचलर, मास्टर, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा या विविध पदवींमध्ये नोंदणी केली होती. म्हणजे महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षणाचा दर हा ३४ टक्के इतका होता. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात शिक्षणाचा दर जास्त आहे. हे प्रमाण शहरी आणि ग्रामीण भागात अनुक्रमे ४० टक्के आणि २९.६ टक्के आहे. त्याचप्रमाणे, पुरुषांमध्ये स्त्रियांपेक्षा जास्त नोंदणी आहे, ही नोंदणी अनुक्रमे ३९.४ टक्के आणि २७.५ टक्के अशी आहे.

जाती–जमातींमध्ये शैक्षणिक दरामध्ये विषमता आहे. उच्च जातीतील हिंदूंमध्ये शिक्षणाचा दर सर्वाधिक ४० टक्के आहे, तर आदिवासी आणि अनुसूचित जातींमध्ये तो दर कमी आहे (सुमारे २९ टक्के) इतर मागासवर्गीयामध्ये शिक्षणाचा दर SC/ST पेक्षा जास्त आहे परंतु ते उच्च जातींपेक्षा कमी आहेत. (३५.६ टक्के). धार्मिक गटांमध्ये मुस्लिम इतरांपेक्षा शिक्षण दरामध्ये खूप मागे आहे कारण त्यांचा उच्च शिक्षणाचा दर फक्त २१ टक्के आहे.

वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, आदिवासी, अनुसूचित जाती आणि मुस्लीम हे शिक्षण विकासामध्ये इतरांच्या तुलनेमध्ये फारच मागे आहे. महाराष्ट्रात उच्च शिक्षण मिळवण्याच्या बाबतीत उत्पन्न गटांमध्ये सुद्धा असमानता आहे. सर्वसाधारणपणे, उच्च उत्पन्न गटाच्या तुलनेत कमी उत्पन्न गटाचा शिक्षण प्राप्तीचा दर कमी आहे. कमी उत्पन्न गटातील शिक्षण प्राप्तीचा दर उच्च उत्पन्न गटाच्या तुलनेत तीनपट कमी आहे. संबंधित नोंदणी दर अनुक्रमे २३ टक्के आणि ६०.३ टक्के आहे.

**गळती दरामध्ये असमानता**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व कमी उत्पन्न असलेल्या वर्गामध्ये उच्च शिक्षणाचा दर कमी असण्याचे प्रमुख कारण उच्च गळती आहे. राज्य स्तरावर २०१७/१८ मध्ये गळतीचे प्रमाण १५.५ टक्के आहे. याचा अर्थ असा की १५.५ टक्के विद्यार्थी त्यांची पदवी पूर्ण होण्यापूर्वी शिक्षण सोडतात. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात ही गळतीचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण १८.२ टक्के आणि शहरी भागात १२.२ टक्के आहे.

त्याचप्रमाणे, गळतीचे प्रमाण पुरुषांपेक्षा महिलांमध्ये जास्त आहे, अनुक्रमे १६.३ टक्के आणि १४.८ टक्के. गळतीची आकडेवारी राज्यातील आंतर-समूह असमानता देखील प्रकट करते. गळतीचे प्रमाण अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ओबीसी मध्ये उच्च जातीचा तुलनेत जास्त आहे. ही आकडेवारी अनुक्रमे २५.२ टक्के, १९.९ टक्के, १५.४ टक्के आणि १०.८ टक्के आहे.गरीब आणि अनौपचारिक मजूर कुटुंबातील विद्यार्थ्यांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आहे. अनौपचारिक मजूर कुटुंबांमध्ये हे प्रमाण २५.५ टक्के आहे, त्यानंतर शेती आणि व्यवसाय करणा–या कुटुंबांमध्ये १३.४ टक्के आणि नियमित नोकरी करणा–या कुटुंबांमध्ये १२.६ टक्के आहे. त्याचप्रमाणे, उच्च उत्पन्न गटांपेक्षा कमी उत्पन्न गटांमध्ये गळतीचे प्रमाण जास्त आहे. उच्च उत्पन्नातील गटामध्ये गळतीचे प्रमाण ६.३ टक्के आहे व त्या तुलनेत कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांचे गळतीचे प्रमाण २२.५ टक्के आहे. जे की जवळजवळ ४ पटीने जास्त आहे.

ह्यावरून असे दिसते की, महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणात शिक्षण प्राप्तीमध्ये असमानता कायम आहे. कमी उत्पन्न असलेल्यांमध्ये शिक्षणाचा दर कमी आहे आणि उच्च जातींच्या तुलनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मुस्लिम व बौद्धांमध्ये शिक्षणाची प्रगती कमी आहे. खालच्या जाती आणि उच्च जातींमधील पारंपारिक असमानता अजूनही कायम आहे. तसेच, महिला आणि ग्रामीण भागात पुरुष आणि शहरी भागांपेक्षा शिक्षण प्राप्तीचे प्रमाण कमी आहे.

सद्याच्या सरकारने सन २०२० च्या साली शैक्षणिक धोरण आणले. ह्या धोरणाचा भर गुणवत्तेकडे जास्त आहे. किंबहुना गुणवत्ता वाढविण्यासाठी जी धोरणे सुचविली आहेत, त्यामुळे गरीब व अनुसूचित जाती, जमाती, मुस्लीम व बौद्ध ह्याचा शिक्षणामधील वाढ कमी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे २०२० शैक्षणिक धोरणाचा विरोध करणे आवश्यक आहे. असमान शैक्षणिक विकास हासुद्धा निवडणुकीचा भाग असणे गरजेचे आहे.

## महगाईचा भस्मासुर

*गतसाली एका व्यक्तीच्या दोन वेळच्या जेवणाचा स्वयंपाक करण्यास लागण्याऱ्या जिन्नसांसाठी १०१.८ रु मोजा-वे लागत. यंदा नव्हढ्याच जेवणासाठी त्याच घटकांसाठी खर्च करावी लागणारी रक्कम १५४.४ रु इतकी आहे. गतसाली एका व्यक्तीच्या म हिनाभराच्या दोन वेळच्या जेवणासाठी ३,०५३ रु लागत. आज हीच रक्कम ४,६३१ रु. इतकी आहे. आणि हे सर्व फक्त शाकाहारींसाठी. यात इंधनाचे खर्च धरण्यात आलेले नाहीत. ही मांडणी फक्त खाद्यान्नांसा-ठीच्या जिन्नसांच्या मूल्याबाबत आहे. याचा अर्थ एका व्यक्तीच्या दोन जेवणांच्या खर्चासाठीच्या रकमेत गेल्या १२ महिन्यांत तब्बल ५२ टक्के इतकी वाढ झाली*

## अपघातांची मालिका



*समृद्धी महामार्गावर आजवर एकूण ११५ गंभीर अपघात झाले. यामध्ये २०२ लोकांनी जीव गमावला. समृद्धी महामार्ग चार विभागात विभा-गलेला असून सर्वाधिक १११ मृत्यू नागपूर विभागातील आहेत. महामार्गावर २०२३ मध्ये १०४ लोकांचा तर २०२४ मध्ये ७२ लोकांनी प्राण गमावले आहेत. 'समृद्धी' वर लहान-मोठे असे एकूण दोन हजार १६१ अपघात घडल्याची माहिती सुरक्षा पोलिसांनी न्यायालयात दिली.*

# दुष्टचक्रात अडकलेला शेतकरी

–प्रा. आर. ए. देशपांडे

महाराष्ट्रात राज्यासमोरचे सगळ्यात मोठे आव्हान म्हणजे सतत त्रासदायक ठरलेले कृषी क्षेत्रावरील संकट. शेतक–यांच्या आत्महत्या ह्या जवळपास महाराष्ट्रात अंगवळणी पडल्यासारख्या झालेल्या आहेत.त्याबाबत बराच डोंब उसळतो आणि काही काळानं–तर आपोआप शांत होतो आणि शेतकरी हा त्या दुष्टचक्रात सतत पिसला जातो. महाराष्ट्रातील मोठा प्रदेश हा दुष्काळ प्रवण असून ह्या प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी आहे. परिणामतः 'नेमेची येतो दुष्काळ' आणि शेतक–यांचा आर्थिक कणा मोडून जातो, ह्या परिस्थितीकडे हेतुतः दुर्लक्ष केल्या गेले.

सिंचन क्षेत्रात सध्या महाराष्ट्र राज्याचे एकूण सिंचन हे २० टक्क्याच्या पेक्षा सुद्धा कमी आहे आणि इतर राज्यांच्या तुल–नेत महाराष्ट्र राज्याने सगळ्यात जास्त पैसा सिंचनावरती खर्च केलेला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही कमतरता लक्षात घेवून सुद्धा त्याबाबत धोरणाद्वारे सुधारणा करण्या–चा प्रयत्न केला नाही किंवा दीर्घकालीन कृषी धोरणाचा तर कधीच प्रयत्न केला गेला नाही. जेंव्हा कधी अत्यंत बिकट वेळ येते तेव्हा तेव्हा शेतकर्यांच्या त्रासावर क्षुल्लक उपाययोजना करून पुढे त्याचा पाठपुरावा न करता पुनःदुस–या आपत्तीची वाट पहात धोरणकर्ते राज्य करतात. महाराष्ट्रात एक दीर्घकालीन धोरणात्मक विचार केला गेला पाहिजे, जो किमान पुढच्या दशकापर्यंत जाईल आणि त्यात बाजार, तंत्रज्ञान, जमीन आणि कच्च्या मालाची वितरण प्रणाली या प्रमुख निर्धारकांचा समावेश असेल.

शेतजमीन व भूसंपादनाच्या बाबतीत राज्य गंभीर परिस्थितीला तोंड देत आहे. गेल्या दशकात झपाट्याने पिकाखालील १२ लाख हेक्टर पेक्षा जास्त जमीन कमी झालेली आहे आणि ती इतर उपयोगांकडे वळविली गेली. ख–या शेतक–यांची संख्या १९९१ ते २०११ दरम्यान खूप घटली आहे. गेल्या चार दशकात अल्पभूधारकांची संख्या २६ लाखांनी वाढली आहे. त्यामुळे जमीन धारणेचा आकार सतत कमी होत चालला आहे आणि त्यामुळे शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य ठरत आहे. आता तर अल्प आणि अत्यल्प (विशेषतः दलित) शेतकर्यांचा शेती व्यवसाय दिवाळ खोरीच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. ह्यामुळे अत्यल्प भूधारक आणि अल्पभू धारक शेतक–यांची सतत घटणा–या निव्वळ मिळकतीमुळे त्यांना शेती व्यवसायातून बाहेर पडण्यास भाग पाडत आहे. गेल्या दशकात, म्हणजे २००१ ते २०११ ह्या दोन जनगणनेत महाराष्ट्रातील शेतक–यांचे प्रमाण हे २८.७ टक्क्यावरुन घसरून २५.४ टक्क्यापर्यंत खाली आले आहे ह्याच वेळी



शेतमजुरांचे प्रमाण हे २६.२६ टक्क्यांवरून २७.३ टक्के इतके वाढले आहे. म्हणजे एकूण शेतक–यांचे प्रमाण कमी होत आहे आणि शेत मजुरांचे प्रमाण वाढत आहे. अर्थातच शेतकरी शेती व्यवसाय सोडत आहेत हे स्पष्टच होते, पर्यायाने शेतमजूर वाढत आहेत पण, कारण म्हणजे शेतमजूर वा अल्प व अत्यल्प भूधारकांना शेती कामातून

मिळणारे दरडोई उत्पन्न हे शहरात कुठलीही मजूरी करून मिळणा–या उत्पन्ना पेक्षा खूपच कमी असते. ही एक शोकांतिका आहे. ह्याचा परिणाम हा राज्याच्या स्थूल उत्पन्नामध्ये कृषी व पशुसंवर्धन यांचा वाटा तुलनेने सतत घसरणीत दिसून येतो. ही घसरण १९६०–६१ मध्ये २६ टक्क्यांवरून सुरू होऊन २०१९–२० साली १०.४ टक्क्यांपर्यंत पोचली आहे. परिणामी राज्यातील शेती (फक्त ऊस वगळता) ही देशपातळीवरील शेतीइतकी उत्पादक नाही हे लक्षात येते. पण त्याकडे धोरण कर्त्यांचे दुर्लक्षच आहे. कृषी क्षेत्रातील धोरणे अपरिहार्यपणे कठीण आकृतीबंधातून जातात.

अशा प्रक्रियेत किमान पाच ठळक अडचणींची यादी करता येईल. प्रथम, कृषी हे असंघटित क्षेत्र आहे आणि म्हणूनच, विविध घटकांचा धोरणात्मक प्रतिसाद आणि एकूण संभाव्यता फक्त पूर्वानुभवावरुन सांगता येत नाही तर सध्याच्या परिस्थितीशी निगडीत असते.दुसरे, कृषी क्षेत्राकडे माहितीचा प्रवाह इतर क्षेत्रांइतका जलद होत नसतो ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षणात सिंचना खालील क्षेत्राची आकडेवारी ही २०१०–११ पासून प्रत्यक्ष सरकारला उपलब्ध नाही असे अगदी कुठलीच तमा न बाळगता नमूद केले आहे. खर तर तपशीलवार माहिती उपलब्ध नसते आणि असलेली माहिती ही विशुद्ध नसते ही वस्तुस्थिती आहे. परिणामांबद्दल वस्तुनिष्ठ संभाव्यतेच्या अनुपस्थितीत, माहितीतील विषमतेवर आधारित, तपशीलवार अभ्यास न करता किंवा अनियंत्रितपणे कुठल्याही घटकाशी चर्चा न करता धोरणे तयार करण्या–ची प्रक्रिया महाराष्ट्रात सर्वसाधारण आहे. त्याबाबतची कुणालाही खंत नाही. तिसरे, बहुतेक सगळ्या राज्यातील कृषी–हवामान क्षेत्रांचे हवामान अवलंबित्व हे अगदी स्पष्ट आहे आणि त्यामुळे वेळेवर धावपळ करून आग विझवण्याची जी प्रवृत्ती महाराष्ट्रात आहे ती अत्यंत हानिकारक आहे आणि अशा घाईत धोपटलेल्या योजना ह्या दूरगामी धोरणाचा गाभा होऊच शकत नाहीत. चौथा, महत्त्वाचा घटक म्हणजे या क्षेत्रातील उत्पन्न आणि मालमत्तेच्या वितरणातील असमानता हा नेहमीच कळीचा मुद्दा राहिला आहे. कुठलेही धोरण हे उत्पन्न आणि किंमतीतील फरकामुळे अधिक गुंतागुंतीचे होते, हे कृषि क्षेत्राचे नेहमीचे दुखणे ज्यावर अजूनही उपाययोजना केलेली नाही. गेल्या साठ वर्षात महाराष्ट्रात किंवा इतर ब–याच राज्यात दूरगामी कृषि धोरण तयार करण्याची व्यवस्थाच निर्माण केलेली नाही.

ह्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी, या क्षेत्राचा ग्राहक व इतर उद्योगांशी मजबूत असा संबंध आहे, परंतु बाजारपेठेतील सापत्नभाव हा शेती क्षेत्राला त्याचा योग्य परतावा (Terms of Trade) मिळूच देत नाही. हाच मुद्दा शरद जोशींनी शेतकरी आंदोलनात

बरीच वर्ष लावून धरला होता. त्यातून काहीही निष्पन्न निघाले नाही. कोणत्याही देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेची वाढ ही कृषि क्षेत्रातील चढउताराबाबत संवेदनशील असते. त्यामुळे, भारतातील तसेच इतर अनेक देशांतील कृषीधोरणांवर त्या राज्यांचे अथवा देशांचे मजबूत आर्थिक धोरण अवलंबून असते. अशा दूरगामी कृषिधोरणाच्या अभावा मुळेच महाराष्ट्राच्या कृषिक्षेत्रात अत्यंत गंभीर परिस्थिती असते व शेतर्क–यांना आत्महत्या कराव्या लागतात. तेव्हा अन्नदात्याकडे केव्हा लक्ष देणार !

***

## लोकभावना

## देशाची भूक भागवणारा किसान – न्यायाच्या प्रतिक्षेत



-अमिताभ पावडे
(पूर्व परियोजना प्रबंधक
भारतीय विमानपत्तन प्राधिकरण)

१)सवंग लोकप्रियतेसाठी सामाजिक/ धार्मिक सौहार्द नष्ट करुन समाजा–समाजात व व्यक्ती–व्यक्ती मधे द्वेष निर्माण करणारी विषारी शक्ती पासुन राज्य व्यवस्था वा–चवणे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे. त्यामुळे सर्वप्रथम जातीय/सामाजिक/धार्मिक विद्वेष पसरव–णार्या विचार धारेला राजकीय व्यवस्थे पासुन दुर ठेवणे.

२) संविधानिक प्रावधानांची अंमलबजावणी करुन संविधान रचयितांना अपेक्षित आर्थिक व सामाजिक समतेचा आग्रह करणे.तसेच शाश्वत रोजगारांतून सन्मानाने आपली भाकरी कमावणे. अगतिकता व लाचारीने सरकारी ''फुकट'' धान्य इत्यादीं योजनेचा धिक्कार करणे व भारतीयां च्या स्वाभिमान जपणे.

३)श्रृंगारिक विकास जसे मेट्रो,बुलेट ट्रेन ,उड्डाणपूल, पुतळे व शहरी सुशोभीकरणा ऐवजी जनतेच्या मुलभूत गरजां जसे स्वच्छ पेयजल,सिंचन, वीज, रोजगारक्षम शिक्षण , रोजगार संधी, आरोग्य या प्रश्नाकडे लक्ष द्यावे.

४) भारत कृषिप्रधान देश आहे व कृषक व शेतमजूर आत्महत्या करत आहेत कारण सरकारी नीती मुळे शेतर्क–यांचे शोषण.त्यामुळे कृषीनीतीमधे अमुलाग्र बदल करुन देशासाठी संपत्ती निर्माण करणारी, ५०% रोजगार निर्माण करणारी व संपूर्ण देशाची भूक मिळविणारी कृषी अर्थव्यवस्था अधिक मजबुत होईल.

५)अनुत्पादक शहरी सुशोभीकरण म्हणजेच 'स्मार्ट सिटी' ऐवजी ग्रामीण भागात उत्पादक योजना जसे 'गाव तिथे तलाव' व कृषि आधारित उद्योग सारख्या योजना राबवून अगतिक ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर थांबवावे.या साठी सरकार ने मोठी गुंतवणूक करावी.

६)भारतीय संस्कृतीत महिला व कष्टकर्यांचे नेहमीच ''शुद्र'' आर्थिक, मानसिक व सामाजिक शोषण करण्यात आलेले आहे .या दोन्हीत वर्गात आज संविधानिक प्रावधानांचा न्याय पोचलेला नाही. सरकार कडून संविधानात नमूद राज्य निदेशक तत्त्वांची ( ३८ व ३९) अंमलबजावणी करून ताबडतोब न्याय द्यावा.

७) भारतीय राजकीय व्यवस्थेत पक्षीय राजकारणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, त्याची प्रचिती प्रत्येक निवडणुकीत येते मात्र जनतेने 'कायद्याच्या राज्या' साठी आग्रही लोकांनाच मतदान करावे.

८) संविधानिक न्याया साठी सातत्याने लढा देणारे उमेदवार निवडुन द्यावेत व संविधानिक मुल्य जपावेत.

९)निवडणुकीत भ्रष्टाचाराचा पैश्याने जातीय/ धार्मिक/भाषिक/ लैंगिक/प्रादेशिकते वर द्वेष पसरवणार्यां पासुन सावध राहुन सामाजिक सौहार्द , सामाजिक सन्मान व आर्थिक स्वावलंबनासाठी काम करणार्या व्यक्ती/विचार सरणीला निवडुन द्यावे...

सारे अर्थचक्र आणि राज्यसत्ताचक्र हे शेती क्षेत्राला लुटते आहे. गॅट कराराच्या वेळी भारत सरकारने '
दिलेल्या लेखी हिशोबाप्रमाणे शेती क्षेत्र स्वतः उणे' ७२ टक्के सरकारी सवलत भोगून देशाला पोसते. या कारणामुळे, कृषि–खर्च–व–मूल्य– आयोग
(CACP) चे तत्कालीन अध्यक्ष गुलाटी यांनी सरकारला दिलेल्या हिशोबाप्रमाणे वर्ष २००० ते २०१५ या १५ वर्षांतच शेतक्यांना ४५ लाख कोटी रुपये भुर्दंड बसला. हे सरकारीधोरणामुळे. म्हणजे वर्षाकाठी तीन लाख कोटी रुपये

# लोकभावना

## नवीन शैक्षणिक धोरण बहुजनांच्या गळ्याला फास

येत्या निवडणुकीत प्रत्येक नागरिकाच्या जगण्या–मरणाचा प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, वाढती महागाई त्यामुळे जनसामान्याचे मोडलेले कंबरडे याची चिंता सत्ताधा–यांनी व जे सत्तेवर निवडून येतील अश्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. हि जबाबदारी ते नाकारीत असतील त्यांचे मनसुबे फक्त भांडवलदारांचे कर्ज माफ करणे, त्यांना विशिष्ट सोयीसवलती पुरविणे व जनसामान्याचे शोषण करून संविधानाने दिलेल्या जगण्याचा अधिकार व स्वातंत्र्य



अॅड. सुषमा भड
अध्यक्ष: राष्ट्रीय ओबीसी महिला

पायदळी तुडवीणे असे असेल तर जनतेने अशा व्यक्ती किंवा पक्षाला आपले अमुल्य मत देऊन स्वतः च व आपल्या पिढ्यांचे भविष्य बर्बाद करून आपल्याच लेकरांच्या भविष्याशी खेळ करू नये. त्यासाठी सर्व बहुजनांनी संघटीत होऊन सत्ताधारी व शासनकर्ती जमात होण्यासाठी कंबर कसली पाहिजे. त्यासाठी खालील बाबींकडे लक्ष दिले पाहिजे.

१. सर्वांसाठी शिक्षण व आरोग्य यासारख्या मुलभूत सुविधांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे
२. शेतीचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे
३. जातनिहाय जनगणना झाली पाहिजे
४. शेतक–यांना बिनव्याजी पतपुरवठा केला पाहिजे
५. खते, बियाणे व शेतीची अवजारे व इतर संसाधने ऋण मुक्त झाले पाहिजे
६. काळ्याधनावर सरकारने श्वेत पत्रिका जारीकरून काळे धन भारतात आणावे
७. EVM बँन करून निवडणुका मतपत्रिकेव्दारे घेतले पाहिजे
८. वीज, पाणी, घर हे नागरिकांचा मुलभूत हक्क मानून सर्वांना परवडेल अशा माफक दरात उपलब्ध करावेत
९. प्रत्येक गावातील विकास कामे ग्रामसभेच्या परवानगीने व्हावीत आणि गाव स्वयंपूर्ण करावे
१०. सर्व शेतकरी विरोधी कायदे रद्द झाले पाहिजे
११. कामाचा कालावधी फक्त ८ तास असला पाहिजे
१२. शेतक–याच्या मालाला हमीभाव मिळालाच पाहिजे
१३. गाव तिथे शाळा असलीच पाहिजे
१४. नवीन शैक्षणिक धोरण रद्द करून जनसामान्याच्या हिताचे सर्व गोरगरीब, वंचित, शोषित, पिडीत यांना दर्जेदार शिक्षण मिळालेच पाहिजे
१५. महिलांना ५० % उमेदवारी प्रत्येक पक्षाने दिली पाहिजे
१६. बेरोजगारांना शासकीय व खाजगी क्षेत्रात नौकरी मिळाली पाहिजे व कंत्राटीकरण पूर्णतः बंद केले पाहिजे
१७. लाडकी बहिण सारख्या योजना ऐन निवडणुकीच्या तोंडावर घोषित करून जनतेच्या पैश्याची अवास्तव लुट थांबविली पाहिजे. व बहिणींसाठी शाश्वत विकासाचा योजना राबविल्या पाहिजे
१८.अवाजवी सिमेंटीकरण करून पर्यावरणाचे प्रदुषण वाढवू नये व जीवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजे जो पक्ष लोकशाही सुदृढ करेल व सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणार नाही, गरीब बेरोजगारांच्या हाताला काम मिळवून देईल, तसेच लोकशाहीचा चौथा स्तंभ माध्यमे व सरकारी यंत्रणा यांचा दुरुपयोग करणार नाही. महागाईवर नियंत्रण करेल. अशा पक्षाला मत दिले पाहिजे.

***

## संविधानिक लोकशाहीचे जतन करावे

-विलास भोंगाडे
(भारत जोडो अभियान-विदर्भ समन्वयक)

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतात राजेशाही होती. राजेशाहीची एकछत्री सत्ता होती.

त्यावेळी लोकांच्या मताला किंमत नव्हती. सत्तेत व राज्य शासनाच्या प्रशासनात लोकांना सहभागी करून घेतले जात नव्हते. निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग नव्हता. निर्णय लादले जात होते. त्यातही शिक्षण, आरोग्य सुविधा दिल्यात जात नव्हत्या. दलित व गरीबांना पाणी ,घर व अंग झाकायला कापड पुरेसे मिळत नव्हते. हाताला काम व पोटाला भाकर मिळत नव्हती.ज्यांनी आवाज केला किंवा विचारणा केली तर त्यांना शिक्षा, दंड आणि समाजातून बहिष्कृत केले जात होते. गणराज्य मिळाल्यानंतर संविधानातील प्रास्ताविकातील मुल्यविचार व मुलभुत अधिकारानुसार लोकशाही मूल्यांची पुनर्स्थापना झाली.

त्यामुळे शिकणे,वाचणे, भाषण देणे, अभिव्यक्त होणे, संघटन करणे व संघर्ष करता आले. त्यामुळे भारतीय समाज प्रगल्भ झाला. शिकू लागला, रोजगार प्राप्त करून थोडी संपत्ती जमवू लागला व घर बांधू लागला. हे सर्व लोकशाहीचा अवकाश मिळाल्या मुळे घडले. जातीपाती मधील बंधने तोडून खुल्या आकाशात मुक्तपणे संचार करू लागला. त्यामुळे त्याला स्वविकास करता आला. परंतु काही दिवसानंतर लोकशाहीचा संकोच होताना दिसत आहे. लोकशाही प्रक्रियेत सत्तेच्या राजकारणात सतत बदल होत असतात. ते सांविधानिक कायद्यानुसार झाले पाहिजे.संविधानाच्या उद्देशिके नुसार होने गरजेचे आहे.परंतु संविधानाला बगल देऊन संविधानाची व लोकशाहीची मोडतोड २०१४ पासून केली जात आहे. लोकशाही धाब्यावर बसवून आक्रमक पणे झुंडशाही करून, धर्माचे राजकारण करून, हुकूम शाही राबवत निर्णय घेतले जात आहेत. लोकांची मते विचारात घेतली जात नाहीत. लोकांच्या प्रश्नाला बगल देऊन कायदे मोडतोड केले जात आहेत. कामगार कायदे संपुष्टात आणलेत. भूसंपादन कायदा मोडून टाकला. जल जंगल जमिनीवरील विस्थापन वाढले आहे. डोंगर फोडले जात आहेत. खनिज संपदेचे दोहन सुरू आहे. कुणी आवाज उठविला तर त्याला बंदुकीच्या गोळीला सामोरे जावे लागते. कुणी लिहिले तर त्याला शहरी नक्षलवादी ठरविले जाते. जातीचे प्रश्न अधिक घट्ट झाले आहेत.

दलित– आदिवासींना विशेष संधी नाकारली जात आहे. स्त्रीवादी विचारावर बंधने आली आहेत. जाती धर्मातील दुरावा वाढला आहे. अल्पसंख्यांकाना म्हणजे मुस्लीम व ईसाई लोकांचे धर्मस्थळे तोडली जात आहेत. त्यांना भारतीय मानले जात नाही. त्यांचे मूलभूत अधिकारांची पायमल्ली केली जात आहे. त्यांना संरक्षण नाही. लोकांना सुरक्षित वाटत नाही. भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ते दूर करावे लागेल. तसे सरकार व राज्य शासन असावे लागेल. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

लोकशाहीची बुज राखणारे सरकार व प्रशासन करणारे सरकार पाहिजे. संविधानिक मूल्यांची जपणूक करणारे व कायद्याचे पालन करणारे सरकार पाहिजे. त्यासाठी तमाम जनसंघटनानी एकत्र येऊन लोकशाहीवादी सरकार स्थापन करावे.

***

## महाराष्ट्र बचाव खोका सरकार भगावो

महाराष्ट्र के विधानसभा चुनाव में महाराष्ट्र की अस्मिता गांधी जी, फुले, शाहू, आंबेडकर , शिवाजी महाराज जिनके विचार कहीं ना कहीं खत्म किए जा रहे हैं यहां एक सभ्यता का कल्चर छोड़कर बीजेपी द्वारा घटिया राजनीति की मानसिकता सिर्फ सत्ता प्राप्त करने के लिए



जगजीत सिंग
अध्यक्ष अंधश्रद्धा निमर्लन समिती नागपूर

अलग–अलग संगठन को तोड़ना और किसी तरीके से भी महाराष्ट्र में अपनी सत्ता बनाए रखना ही बीजेपी का एक मात्र उद्देश है और इनका साथ कुछ लालची नेता खुल कर दे रहे हैं

इसमें कहीं न कहीं आम जनता के प्रश्न पीछे छूट जाते हैं क्योंकि रात दिन तिकड़म की राजनीति में जनता के क्या हाल है इसके तरफ किसी का ध्यान नहीं होता आज जनता अत्यंत महंगाई , बेरोजगारी, किसान आत्महत्या, मराठा समाज का आरक्षण को लेकर संघर्ष,obc की जनगणना का संघर्ष, अल्पसंख्यक समाज के अपने प्रश्न, शिक्षा, स्वास्थ्य, बिजली, पानी, ग्रामीण क्षेत्र की तरक्की और एक आम इंसान की समृद्धि इन सब बातों को ध्यान में रखकर इस चुनाव में हमने हमारे सरकार को चुनना चाहिए आज इस खोका सरकार ने महाराष्ट्र पर अपनी लुभावनी (लाड़की) योजनाओं की वजह से करोड़ों का कर्ज लाद दिया गया है पहले ही १२ हजार करोड़ के बजट पर ६ हजार करोड़ का कर्जा था एक तरफ सरकार जब चाहे ऑर्डिनेंस लाकर की किसी भी चीज का रेट बढ़ा देती है बिजली का बिल का बोझ आम आदमी से सहन नहीं हो रहा है, घर टैक्स आसमान छू रहे हैं, शिक्षा – सरकारी स्कूल बंद किए जा रहे प्राइवेट शिक्षा के लिए कर्ज ले कर पढ़ना पड़ता है , स्वास्थ– सरकारी अस्पताल की अवस्था जर्जर हो चुकी है और एक आम इंसान वहां पर इलाज नहीं करवा पा रहा है और प्राइवेट अस्पताल में इलाज करवाने के लिए उनका घर तक बिक जाता है, पानी का वितरण नेताओं की मिलीभगत से निजी कंपनियों को दे दिया जा रहा है, पेट्रोल महंगा , गैस सिलेंडर महंगा , सब्जी महंगी, तेल महंगा, हर तरफ से जनता बेचारी मारी जा रही है.

# लोकभावना

## न्याय व समानता यह सरकार का मुलतत्व होना चाहिये

इस चुनावों में जनता के सामने अनेक गंभीर प्रश्न है जिसमें सबसे महत्वपूर्ण इस देश की मूल संवैधानिक मंशा है संविधान के मूलभूत तत्वों की सुरक्षा काल के इस मोड पर देश वासियों के लिए सबसे बडी चिंता का विषय है । अन्य विषयों पर भी सामान्य जनता बहुत परेशान है – बढती बेरोजगारी, गरीबों और अमीरों के बीच में बढती असमानता विभिन्न समाजों और धर्मी के बीच में बढती दूरियां, नफरत के नशे में पागल होते हैं देश के नौजवान , झूठ और अफवाहों से भरा देश का मीडिया, सरकारी एजेंसियों का गलत इस्तेमाल, तानाशाही के तरफ बढते राजनेताओं



डॉ. अन्वर सिद्दीकी
मुस्लिम लेखक आणि विचारवंत

के लक्षण, झूठे स्टॅटिस्टिक और झूठे सर्वे के आधार पर जनता को दिलासा दिलाने वाली सरकारे।

यह सब प्रश्न जनता के सामने प्रमुख समस्या के तौर पर खडे है । समाज की इन समस्याओं से लडने के लिए असल में तो सरकार को अपनी मंशा में परिवर्तन करने की आवश्यकता है सरकार केवल बहुमत या किसी अंधविश्वास और अपना फैसला ना लें बल्कि न्याय और समानता यह प्रशासन का मूल तत्व होना चाहिए इसके लिए अब इस सरकार से कुछ भी हो पाना हमें असंभव लगता है इसलिए सरकार क्या करे इस पर सबसे उचित उत्तर यही होगा कि इस मानसिकता के लोग सरकार से हट जाए ।

जनता ने अपना वोट कुत्सित विचारधारा और घटिया मानसिकता के लोगों को बदलने के लिए देना चाहिये लिए अभी सबसे महत्वपूर्ण किस पार्टी को वोट देनेसे ज्यादा स्पष्ट इससे पार्टी को वोट नहीं देना यह भूमिका है अतः मुझे लगता है कि संविधान विरोधी मानसिकता, समानता विरोधी मानसिकता, लोकतंत्र विरोधी मानसिकता और न्याय विरोधी मानसिकता को समाप्त करने के लिए सबसे नजदीकी पार्टी जो भी हो उसी को वोट देना चाहिए ।

***

## सामाजिक सौहार्द नष्ट करणाऱ्या शक्तीपासून देश वाचविणे कर्तव्य

**येत्या निवडणुकीत जनतेचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न**

सन २०२४ च्या विधानसभेच्या पार्श्वभूमीवर अनेक मतदार संघातील लोकांसोबत चर्चा केल्यानंतर असे निदर्शनास आले की, बेरोजगारीचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. शासकीय–निमशासकीय नोकर भरती गेल्या वर्षापासून जवळजवळ बंद आहे. युवक–युवती प्रचंड नाराज असून अस्वस्थ आहेत. झिरो बजेटपेक्षा भयावह परिस्थिती आज महाराष्ट्रात आहे. बेरोजगारीचा दर गेल्या ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे. हे संघटित क्षेत्रातील रोजगारांचा झालं, असंघटित क्षेत्रातील तरुणांना वेड लागण्याची वेळ आली आहे. जे मानसिकरित्या मजबूत.

असतील जे फुले–शाहू– आंबेडकरी विचारधारेचे असतील ते अत्यंत कठीण परिस्थिती असूनही स्वत:मधील क्षमता विकसित करून जसे भाषेवर प्रभुत्व, विविध भाषा शिकण्याची तयारी, कृत्रिम बुद्धिमत्ता व तत्सम संगणकीय/डिजिटल भाषा, मेजर शिक्षणासोबत मायनर शिक्षण विषयक अभ्यासक्रम शिकून पुढे येतील. जे कमकुवत असतील त्यांना या 'जॉबलेस ग्रोथ' असलेल्या अर्थव्यवस्थेत टिकून राहणे कठीण जाईल. आता शेतकरी, शेतमजूर आत्महत्या करीत आहे. येणा–या काळात बेरोजगारीला कंटाळून तरुण–तरुणींच्या हाताला काम नाही, म्हणून कुठेले पाऊल उचलले हे सांगायला कोणाची गरज नाही, असे प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न माझ्यामते या निवडणुकीत महत्त्वाचा असणार आहे.

**समाजाच्या प्रमुख समस्या व त्यावर शासनाकडून अपेक्षा**

कल्याणकारी लोकशाही व्यवस्थेत किमान तरुणांसमोर, शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्यासमोर आशावादी दृष्टिकोन ठेवावयास पाहिजे असे चित्र सध्या दिसत नाही. काही मिळालं नाही तरी काही वेळ चालेल तथापि माझं भवितव्य, सुरक्षा या सरकारच्या कार्यभारात सुरक्षित आहे हा विश्वास असायला हवा. हा विश्वासच जनतेमध्ये नाही हे शासन सपशेल यामध्ये अपयशी ठरले आहे. त्यामुळे प्रचंड बेरोजगारी, महागाई, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्यांकांमध्ये असुरक्षिततेची भावना, जाती–जातीत धर्मामध्ये भेद, ओबीसी–एससी–एसटी, अल्पसंख्यांकांमध्ये 'आरक्षण' या विषयाला धरून अविश्वासाच्या भावना शेतक–यांना कायद्यानुसार त्यांच्या मालाला हमीभाव, असंघटित कामगारांचे प्रश्न, शिक्षण व आरोग्याची दुरावस्था इत्यादी प्रश्न महत्त्वाचे आहेत. हे सर्व महत्त्वाचे प्रश्न बाजूला पडून महाराष्ट्रात वरच्या दोन प्रवर्गातील वर्णवर्चस्वाच्या लढयात बळी समूह नेहमीच भरडला जातो. तसाच हा बहुसंख्य वर्ग आजही जातीच्या प्रश्नामुळे मागे पडेल हे खात्रीने सांगता येईल. शेवटच्या टप्प्यात सर्व विसरून 'हा माझ्या जातीचा आहे' मग तो भ्रष्ट, अत्याचारी, नालायक असूनही त्यालाच येथील मतदार निवडून देतो, हे संसदीय लोकशाहीची खरेतर विटंबना आहे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे अभ्यासक्रमातून, शिक्षणातून, 'राजकीय जाणिवा' मतदारांच्या प्रगल्भ कराव्या लागतील. त्यासाठी पुन्हा 'सत्ता' येणे क्रमप्राप्त आहे. तूर्त प्रतिगामी शक्तींना कुठल्याही परिस्थितीत बाजूला सारून किमान संविधानाची जाण असलेल्या आघाडीशिवाय सृजन नागरिकांसमोर सध्या तरी सक्षम पर्याय नाही. यासाठी शासनातर्फे मूलभूत गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार 'केजी टू पीजी' 'शिक्षण सर्वांना द्यावयास पाहिजे. त्यासाठी आवश्यक वाटल्यास 'एज्युकेशन सेस' वाढवायला हवा. शेतक–यांना स्वामीनाथन आयोगानुसार त्यांच्या मालाला कायद्यानुसार हमीभाव देणे, बी बियाणे, खते आणि वस्तूवरील कर रद्द करणे शेतीसाठी पाण्याची सोय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योगासाठी प्रोत्साहनपर योजना राबवून 'रोजगार हमी योजनेद्वारे' शेतीला आवश्यक मनुष्यबळ शासनातर्फे उपलब्ध करून देणे रोजगाराची हमी देऊन ३६५ दिवस मजुरांना काम देणे, त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी साठ वर्षावरील महिला व पुरुष शेतक–यांना आरोग्याच्या सोयी निशुल्क उपलब्ध करून देण्यासाठी 'आरोग्य विमा' मोफत देणे.



-डॉ. संजय शेंडे,
लेखक व अभ्यासक.ओबीसी
चळवळीचे कार्यकर्ते

शेतक–यांनी केलेल्या सेवेसाठी त्यांच्या श्रमाची प्रतिष्ठा करणे किमान पुढील जीवन जगता येईल एवढे पुरेसे मानधन ठरवून देणे,

महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रत्यक्षेत्रात लोकसंख्येनुसार आरक्षण देणे, किमान ३३% आरक्षणाचा कायदा पारित करणे, जीवनावश्यक वस्तूवरील कर कमी करून महागाईवर नियंत्रण ठेवणे, त्याचबरोबर समान वेतन देणे गरजेचे आहे.

जनतेने 'दगडापेक्षा वीट मऊ' या अर्थाने सक्षम पर्याय नसल्याने छातीवर दगड ठेवून लोकसभेच्या धरतीवर महाविकास आघाडीचा पर्याय डोळ्यासमोर ठेवावा तथापि मताधिकार हा प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य असल्याने त्याने त्याने आपल्या विवेकबुद्धीचा नक्कीच उपयोग करावा, असे आवाहन करावेसे वाटते. प्रत्येकाने मतदान नक्की करावे तर लोकशाही व्यवस्था जिवंत राहील.

सवंग लोकप्रियतेसाठी सामाजिक/धार्मिक सौहार्द नष्ट करुन समाजा– समाजात व व्यक्ती–व्यक्ती मधे द्वेष निर्माण करणारी विषारी शक्ती पासुन राज्य व्यवस्था वाचवणे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे.त्यामुळे सर्वप्रथम जातीय/सामाजिक/धार्मिक विद्रेष पसरवणार्या विचार धारेला राजकीय व्यवस्थे पासुन दुर ठेवणे.

## संविधानिक लोकशाहीशी प्रामाणिक राहणे ही मतदारांची जवाबदारी

संविधानीक मुल्यांची वारंवार होणारी प्रतारणा, सामाजिक सुरक्षा, शिक्षणाचा खालावलेला दर्जा, महागाई व बेरोजगारी ई. महाराष्ट्रासमोरील सर्वात महत्त्वाचे प्रश्न आहेत. निवडून आलेल्या उमेदवारांनी स्थापण केलेल्या सरकारची ही जबाबदारी असते की सरकार हे संविधानाच्या आधारावर चालवावे. सर्वसामान्य जनतेचा सरकारवरील विश्वास टीकुन राहावा यासाठी संविधानीक तत्वांच्या आधारावर प्रशासन चालवले जावे. सामाजिक अशांतता दुर करण्यासाठी समाजात फुट पडेल जातीय व धार्मिक भेदभाव वाढेल असे कोणते ही कृत्य शासन स्तरावरून होऊ नये किंवा समाजात फुट पाडणाऱ्या विघातक शक्तींना शासनाने पाठीशी घालु नये.

भाववाढीवर नियंत्रण करणे व पैशाचे विकेंद्रीकरण करून पैसा हा सर्वात शेवटच्या घटकांपर्यंत खेळता ठेवायला हवा कृत्रिम भाववाढीवर नियंत्रण मिळवायला हवं. गडगंज संपत्ती असणाऱ्या लोकांच्या हिताचे आर्थिक निर्णय सरकारने घेऊ नये. सरकारी, निमसरकारी व खाजगी शिक्षण संस्थांमध्ये



-डॉ. सुनीता सावरकर
छत्रपती संभाजी नगर

शंभर टक्के जागापारदर्शकपणे भरल्या जाव्यात. शिक्षण दर्जेदार व मोफत असावे जेणे करून गरीब घरातील मुलंसुध्दा शिक्षण घेऊ शकतील.

दलित, आदिवासी, ओबीसी इतर मागासलेल्या समुहातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी शासनाने पुरेशा प्रमाणात पैशांची तरतुद करणे व तो पैसा याच समुहाच्या शैक्षणिक विकासासाठीच खर्च करणे, आरोग्याच्या किमान सुविधा देणे, महिलांची सुरक्षा व इतर सार्वजनिक सुरक्षा यावर लक्ष देणे गरजेचे आहे.लोकशाही आधारीत समाजव्यवस्था ही या देशाची गरज आहे.

संविधानीक मूल्यांशी प्रामाणीक असलेले लोकनिर्विचीत होणे गरजेचे आहे. मागच्या सरकारचा विचार करता सरकारने घेतलेल्या निर्णयाचे समाजावर पर्यायाने सर्व सामान्य व्यक्तीच्या रोजच्या जगण्यावर काय परिणाम करणारे आहेत याचा विचार मतदारांनी करायला पाहिजे. तात्कालिक प्रलोभन हे कायमस्वरूपी समाजाचे प्रश्न सोडवू शकत नाहीत हा ही विचार व्हायला हवा. पक्ष आणि त्यांनी दिलेले उमेदवार हे संविधानीक मुल्यांच्या व समाजातील सर्वात शेवटच्या घटकांच्या भल्यासाठी किती बांधील होते आणि आहेत याचा विचार मतदारांनी करायला हवा. संविधानाने दिलेला मतदानाच्या हक्काचं मुल्य मतदारांनी समजून घेणं गरजेचं आहे. Right to vote is a matter of Integrity to Indian Constitutional Democracy हा विचार प्रत्येक भारतीय मतदारानं समजून घेणं व तो अमलात आणणे गरजेचे आहे. मतदारांनी जात, धर्म, वंश, नातेसंबंध, भौगोलिक, प्रशासकीय व राजकिय हितसंबंध यापेक्षा संविधानाशी प्रामाणीक राहुन महाराष्ट्रील रहिवासी म्हणून भेडसावणाऱ्या प्रश्नांना प्राथमीकता देणाऱ्या पक्षाची व उमेदवारांची निवड करणं योग्य राहील. मागच्या काही वर्षा तील अनुभवानुसार उमेदवार कोण, कुणाशी आणि कुठल्या विचाराशी प्रामाणिक आहे हे सांगणे कठीण आहे. तरीही कमितकमी उपद्रव मुल्य असलेल्या उमेदवारांना निवडून देण्याकडे मतदारांचा कल असावा असं म्हणण्याची आज वेळ आली आहे.

***

## महत्वाच्या घडामोडी

### आघाड्यांची भरमार

राज्यातील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. सध्या विविध पक्ष व आघाड्यांचे एकीकरण याबाबतच्या चर्चा मोठ्या प्रमाणात होताना दिसतात. अशातच एक मोठा निर्णय आंबेडकरी पक्षाच्या प्रमुखांनी घेतलेला आहे. ज्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे. आंबेडकरी विचारांचे तब्बल सहा पक्ष आघाडी विधानसभेच्या मैदानात उतरले असून एकूण ६७४ अशी सर्वाधिक संख्या या सहा पक्षांची मिळून आहे. सर्वाधिक जागा बहुजन समाज पक्ष बसप व वंचित बहुजन आघाडी लढवत आहे. उत्तर प्रदेशच्या मायावती यांच्या बसपने सर्व २८८ मतदार संघात उमेदवार दिले आहेत. त्यानंतर ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने २०८ उमेदवार उभे केले आहे. आरक्षणवादी आघाडी १२५ जागा लढवत आहे. तर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची रिपाई १ जागा, आनंदराज आंबेडकर यांची रिपब्लिकन सेना ४० आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चुलत पणतू राजरत्न आंबेडकर अनुसूचित जातीसाठी राखीव २० विधानसभा जागा लढवत आहे. आंबेडकरी विचारांच्या राजकीय पक्षांशिवाय विविध आंबेडकरी गट आंबेडकर पक्ष माविआ आणि महायुती या दोन्ही आघाड्यात आहेत. महाविकास आघाडीला प्रोग्रेसिव्ह रिपब्लिकन पार्टीचा तर महायुतीला जोगेंद्र कवाडे यांचा पाठिंबा आहे.बरेलीच्या नीरजने 'अनुसूचित जातीत जन्म घेणं गुन्हा आहे का? असे म्हणत केली आत्महत्या......

## अमानुष जातीयतेचा बळी

अत्यंत हृदय हेलावणारी घटना बरेली (उत्तरप्रदेश) येथे घडली आहे. माझा जन्म अनुसूचित जातीच्या कुटुंबात झाला, माझा काय दोष? काही लोक जातीवाचक शिवीगाळ करून अपमान करतात. अनुसूचित जातीत जन्म घेणं गुन्हा आहे का? असा व्हिडिओ नीरजने बनवल्यानंतर जीवन संपविले.

बरेली येथील जिल्हा रुग्णालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी नीरज सोबत जे घडले ते अत्यंत लाजिरवाणे होते. केवळ २०.५० लाख रुपयांचे घर विकत घेतल्यापासून त्याचा वेगवेगळ्या प्रकारे शेजा-यांकडून छळ सुरु होता. नवीन घर घेतल्यामुळे छळ, घरात राहू देणार नाही असे म्हणून छळ, अशा अपमानामुळे घर विकावे असे नीरजने ठरविले तेव्हा, घर कोणाला दाखवायचे नाही आणि विकायचेही नाही असे दडपण शेजा-यांनी नीरजवर आणले होते. शेजा-यांना अशी भीती होती की नीरजला विकू दिले तर तो अनुसूचित जातीच्या लोकांनाच घर विकेल, त्यापेक्षा नीरजला ते घर विकण्यापासून थांबवावे असा प्रयत्न शेजारी करत होते. या अपमानाला कंटाळून नीरजने गळफास घेऊन आत्महत्या केली.

**मतांची विभागणी रोखण्यासाठी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन एकता आघाडी महाविकास आघाडीसोबत.....**

विधानसभा निवडणुकीत भाजपची भिस्त ही प्रामुख्याने मित्र पक्षांपेक्षा मतविभागणीवर अधिक आहे.
यामुळे रिपब्लिक आणि धर्मनिरपेक्ष मतांची विभागणी होऊ नये यासाठी छोट्या-मोठ्या आंबेडकरवादी संघटना आणि गटांनी रिपब्लिकन एकता आघाडीच्या
माध्यमातून एकत्र येत विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत एकजुटीने उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.

**अमेरिकेत वंशवादानंतर आता जातीयवाद फोफावतो आहे-**

**डॉ. केविन ब्राऊन**

अमेरिका आणि आफ्रिकेतील कृष्णवर्णीय आणि गोरे यांच्यातील संघर्ष आणि भारतातील जातीयवाद यात बरेच साम्य असल्याचे मत साऊथ कॅरोलिना स्कूल ऑफ लॉ चे शिक्षक डॉ. केविन ब्राऊन यांनी व्यक्त केले आहे. भारत आणि आफ्रिकन-अमेरिकेत झालेल्या संघर्षांमधील साम्यांचीं उदाहरण देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत केलेल्या अस्पृश्यांच्या वकिलीला आफ्रिकन-अमेरिकेतील कृष्णवर्णीय लोकांच्या संघर्षाशी जोडले. तसेच भारताप्रमाणे आता अमेरिकेतही जातींनी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास सुरुवात केली असून अमेरिकेत जातीवादाच्या विरोधात कायदा करण्याची मागणी होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. केंद्रीय सामाजिक न्याय विभागाअंतर्गत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमाला प्रसंगी 'अमेरिकन समुदाय आणि भारतीय उपखंडावरील दडपशाही यांच्यातील ऐतिहासिक संबंध' या विषयावर केविन ब्राऊन यांनी वरील प्रमाणे विचार व्यक्त केले आहे.

**डॉ. विजयकुमार माहुरे यांना लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड**

सामाजिक, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात गेल्या ३५ वर्षांपासून सातत्याने करीत असलेल्या अविरत कार्याबद्दल डॉ. विजयकुमार माहुरे यांना लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड प्रदान करण्यात आला. धन्वतरी जयंती समारोह समिती नांदेड, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, डॉ. सुभाष वाघे हेल्थ फाऊंडेशन, डॉक्टर असोसिएशन, रोगनिदान विकृती विज्ञान, पीजी असोसिएशन, इंटरनॅशनल जनरल ऑफ डायग्नोस्टिक अँड रिसर्च नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'आयुर्वेद नॅशनल डे' चे औचित्य साधून डॉ. विजयकुमार माहुरे यांना महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांच्या हस्ते लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल डॉ. विजयकुमार माहुरे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

संकलन..... डॉ. विद्या चौरपगार

***

मुख्य संपादक : डॉ सुखदेव थोरात।
संपादक मंडळ : किशोर खांडेकर डॉ. गौतम कांबळे,
डॉ. जोगेंद्र गवई, विद्या चंद्रा डॉ. अल्का पाटील
सल्लागार मंडळ : डॉ. एम. एल. कासारे , डॉ.विमल थोरात
जनसंपर्क व वितरण व्यवस्था : डॉ. त्रिलोक हजारे
शुद्धोधन देशभ्रतार

लेखकांच्या मताशी संपादक सहमत असेल असे नाही....

मुक्ती विमर्श हे नियतकालिक सुखदेव थोरात यांनी "सामाजिक व आर्थिक समता संघ"च्या वतिने प्लॉट नंबर ३६, ब्रुहन नागपुर गृहनिर्माण संस्था,प्रियदर्शिनी बी. एड. महाविद्यालय, ( चतुर्वेदी ) सोनेगांव, नागपुर-४४००२२,महाराष्ट्र येथे छापले, मुद्रित व प्रकाशित केले आहे.- संपादक- सुखदेव थोरात
MUKTI VIMARSH Printed and published by Sukhadeo Thorat on behalf of Association for Social and Economic Equality and printed, published at Plot No. 36, Bruhan Nagpur, Gruha Nirman Sanstha, Near Priyadarshini B.Ed Collage, (Chutarvedi) Sonegaon, Nagpur-440022, Maharashtra. Editor - Sukhadeo Thorat - Title Code : MAHMAR52041